मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# न्यायालयाच्या इमारत उभारणीला 'गती'

## पहिल्या टप्प्यात ४ मजली इमारत उभारणार : आमदार महेशदादा लांडगे

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

पिंपरी- चिंचवड न्यायालयाच्या बहुप्रतिक्षित इमारतीच्या उभारणीला आता गती मिळाली असून, सार्वजनिक बांधकाम विभागाने निविदा प्रक्रिया सुरू केली आहे. त्यामुळे 'व्हीजन- २०२०' अंतर्गत पाहिलेले आणखी एक स्वप्न पूर्ण होत आहे, अशा भावना भाजपा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केल्या आहेत.

मोशी येथे पिंपरी-चिंचवड न्याय संकूल इमारत उभारण्याचे काम प्रस्तावित आहे. त्यासाठी राज्य सरकारकडून एकूण ८६ कोटी २४ लाख ५१ हजार १६६ रुपयांच्या खर्चाला मान्यता मिळाली आहे. यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे प्रशासनाने ऑनलाईन



निविदा प्रणालीद्वारे बी-२ नमुन्यातील अटीनुसार पात्र/ सक्षम कंत्राटदार/ संस्था/कंपनी यांच्याकडून निविदा मागविल्या आहेत. ई-निविदा उपलब्ध कालावधी दि. ११ सप्टेंबर २०२३ ते दि. ३ ऑक्टोबर २०२३ असा आहे. इच्छुक कंत्राटदारांची निविदापूर्व चर्चा बेठक दि. २० सप्टेंबर २०२३ रोजी सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे येथे होणार आहे. तसेच, निविदा उघडण्याची तारीख ५ ऑक्टोबर २०२३ अशी निश्चित करण्यात आली आहे. सर्व निविदा www.mahapwd.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. दरम्यान, राजकीय इच्छाशक्तीच्या अभावामुळे पिंपरी-चिंचवड न्यायालयाच्या अध्ययावत इमारतीचा अनेक वर्षे प्रश्न प्रलंबित राहिला होता. शहरातील वकील संघटना आणि विधितज्ज्ञांनी याबाबत शासनदरबारी वेळोवेळी मागणी केली होती. आमदार महेश लांडगे यांनी याकामी पुढकार घेतला. राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या काळात हा विषय लावून धरला. मात्र, महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात हा प्रश्न पुन्हा लांबणीवर पडला होता. त्यानंतर शिंदे-फडणवीस सरकारची सत्ता स्थापन झाली.

### आणखी एक स्वप्नपूर्ती

» आमदार महेश लांडगे म्हणाले की, पिंपरी-चिंचवड न्यायालयाची अध्ययावत इमारत उभारावी, असा निर्धार आम्ही 'व्हीजन-२०२०' मध्ये केला होता. मोशी येथे या चार मजली प्रशस्त इमारतीचे बांधकाम होणार असून, त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे प्रशासनाने राष्ट्रीय स्तरावरील निविदा प्रक्रिया प्रसिद्ध केली आहे. त्यामुळे पिंपरी-चिंचवडकरांच्या हक्काची न्यायालय इमारत दृष्टीक्षेपात आली आहे. शहरातील वकील संघटना आणि पक्षकारांच्या दृष्टीने निश्चितच ही समाधानाची बाब आहे. पीडब्ल्यूडी विभागाने निविदा प्रक्रियेचे कामकाज निर्धारित वेळेत पूर्ण करून इमारतीच्या कामाला सुरूवात करावी. नोव्हेंबर-२०२३ मध्ये इमारतीच्या कामाचे भूमिपूजन मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थित व्हावे, अशी अपेक्षा आहे.

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सहकार्यामुळे नोव्हेंबर-२०२२ मध्ये न्यायालयाच्या इमारतीसाठी निधीची तरतूद करण्यात आली. तसेच, सल्लागार संस्थेचे नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर खऱ्या अर्थाने इमारतीच्या कामाला चालना मिळाली. आता महायुती सरकारच्या काळात निविदा प्रक्रिया करुन इमारतीच्या प्रत्यक्ष कामाला सुरूवात होणार आहे. अध्ययावत न्यायालय पिंपरी-चिंचवडकरांसाठी आगामी दोन वर्षांत उपलब्ध होईल.

# शिवमहापुराण कथा सोहळ्याची उत्कंठा शिगेला!

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

महाराष्ट्रामध्ये प्रथमच पश्चिम महाराष्ट्रातील सर्वात मोठा विनामूल्य श्री अष्ठविनायक शिवमहापुराण कथा वाचन सोहळा पिंपरी-चिंचवडमध्ये होत आहे. त्यामुळे तमाम शिवभक्तांची उत्कंठा शिगेला पोहोचली असून, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शिवकथा वाचक पंडित प्रदिप मिश्रा यांचे शहरात आगमन झाले. शहरवासीयांच्या वतीने त्यांचे भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांनी स्वागत केले. पिंपरी-चिंचवड शहरातील

## प्रदीप मिश्रा यांचे पिंपरी-चिंचवडमध्ये आगमन



लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप मित्र परिवार च्यावतीने श्री अष्टविनायक शिवमहापुराण कथेचे आयोजन दि. १५ ते २१ सप्टेंबर २०२३ दरम्यान दुपारी २ ते ५ या वेळेत पीडब्ल्यूडी मैदान, नवी सांगवी येथे केले आहे. परमपूज्य पंडित प्रदिप मिश्रा यांच्या सुश्राव्य वाणीतून हा अभूतपूर्व अध्यात्मिक सोहळा रंगणार आहे. हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा शिव पुराण कथा मोफत वाचन सोहळा आहे. मध्यप्रदेश येथील प. पु. पंडित प्रदीप मिश्रा यांच्या अमोघ वाणीतून ही कथा ऐकण्याची संधी पिंपरी-चिंचवडवासीयांना मिळणार आहे. या दिवसांमध्ये सुमारे आठ ते नऊ लाख श्रोते या कथेचे श्रवण करतील. त्या दृष्टीने नियोजन करण्यात आले आहे. भाविकांची संभाव्य गर्दी लक्षात घेता भव्य मंडप व संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन करण्यासाठी श्री शिव महापुराण कथा आयोजन समिती गठीत केली आहे.

" पिंपरी-चिंचवडसह पश्चिम महाराष्ट्रातील शिवभक्तांसाठी हा अलौकिक असा भक्ती-शक्तीचा महिमा आणि शिवपुराणाचे ज्ञान देणारा अध्यात्मिक सोहळा आहे. श्री अष्टविनायक शिव महापुराण कथा वाचनासाठी सांगवी येथील पीडब्ल्यूडी मैदानात संपूर्ण तयारी झाली आहे. भाविक-भक्तांनी आणि साधकांनी या मोफत कार्यक्रमाला आवर्जुन उपस्थित रहावे. लोकनेते लक्ष्मण जगताप मित्र परिवार यांच्या पुढाकाराने होणारा या धार्मिक कार्यक्रमासाठी सर्व जाती-धर्मांच्या मान्यवर, नागरिकांना आम्ही निमंत्रित केले आहे.

— शंकर जगताप,
शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# सांडपाणी वाहिन्यांचे 'सीसीटीव्ही' द्वारे सर्वेक्षण!

## वाहिन्या जुन्या झाल्याने त्या तुंबण्याचे प्रकार वाढले




**मोशी । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** शहरातील सांडपाणी वाहिन्या जुन्या झाल्याने त्या तुंबण्याचे प्रकार वाढत असल्याने महापालिकेने वाहिन्यांचे सर्वेक्षण हाती घेतले आहे. संपूर्ण वाहिन्यांचे जाळे आणि नैसर्गिक नाल्याचे सर्वेक्षण 'सीसीटीव्ही' कॅमेऱ्याच्या माध्यमातून करण्यात येत आहे. चेंबरमध्ये कॅमेरे सोडून नाल्याची माहिती घेण्यात येत आहे. सर्वेक्षणानंतर वाहिन्या अद्ययावत करण्यात येणार असून त्यासाठी ३०० कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. पिंपरी-चिंचवड शहरात दोन हजार किलोमीटर लांबीच्या सांडपाणी वाहिन्या, ५३ मोठे नैसर्गिक नाले आहेत. सांडपाणी वाहिन्या नगरपालिकेच्या काळातील ३५ वर्षांपूर्वीच्या आहेत. काही भागांत नव्याने वाहिन्या टाकण्यात आल्या आहेत. गेल्या काही वर्षांत लोकवस्ती वाढल्याने सांडपाणी मोठ्या प्रमाणात तयार होत आहे. मात्र, वाहिन्या जुन्याच असल्याने त्या तुंबण्याचे प्रकार सातत्याने वाढत आहेत.

या पार्श्वभूमीवर महापालिकेने मध्य प्रदेशातील इंद्रुच्या धर्तीवर शहरातील सर्व सांडपाणी वाहिन्या आणि नाल्यांचे सर्वेक्षण हाती घेतले आहे. त्यासाठी डीआरए या एजन्सीची नेमणूक करण्यात आली आहे. शहराचे चार भागांत विभाजन करून सर्वेक्षण केले जात असून सहा महिन्यांत काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे. चेंबरमध्ये शंभर मीटर आतमध्ये 'सीसीटीव्ही' कॅमेरे सोडून सर्वेक्षण करण्यात येत आहे. त्याची चित्रफीत काढण्यात येत आहेत. त्यामुळे जुन्या, नादुरुस्त वाहिन्या समजणार आहेत. सांडपाणी कोठे तुंबते, कशामुळे तुंबते याबरोबरच कोणत्या भागात अधिक क्षमतेच्या वाहिन्यांची गरज आहे, हे स्पष्ट होणार आहे. सर्वेक्षण करणाऱ्या संस्थेकडून वाहिन्या आणि नाल्यांचा संपूर्ण आराखडा महापालिकेस सादर केला जाणार आहे. त्यानुसार महापालिका सांडपाणी वाहिन्या आणि नाल्यांचे काम करणार आहे. शहरात दोन हजार किलो मीटरच्या सांडपाणी वाहिन्या आहेत. शहरातील विविध भागांत सुमारे ९० हजार ते एक लाख चेंबर आहेत. सर्वेक्षणात या सर्व चेंबरला क्रमांक देण्यात येणार आहेत. सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प देखील अद्ययावत केले जाणार आहेत.

> **"सांडपाणी वाहिन्या आणि नाल्यांचे सर्वेक्षण करण्यात येत आहे. सर्वेक्षणानंतर नाले अद्ययावत केले जाणार आहेत. ३०० कोटींचा खर्च अपेक्षित असून केंद्राचे अनुदानही मिळणार आहे.**
> **-संजय कुलकर्णी,**
> **सहशहर अभियंता, पर्यावरण विभाग**

# विद्यार्थ्यांनी पुस्तकी ज्ञानासह व्यावहारिक ज्ञानावर भर द्यावा

## पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांचे वक्तव्य




**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।** दिवसेंदिवस शिक्षण क्षेत्रात मोठे बदल घडत आहेत. सर्वत्र स्पर्धा वाढली आहे. या स्पर्धेत टिकण्यासाठी कौशल्ययुक्त ज्ञानाची गरज भासू लागली असून विद्यार्थ्यांनी पुस्तकी ज्ञानासह व्यावहारिक ज्ञानावर भर देणे आवश्यक आहे, असे मत पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी व्यक्त केले. आकुर्डी येथील केंब्रिज इंटरनॅशनल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांशी संवाद या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांसोबत संवाद साधताना आयुक्त बोलत होते. यावेळी, विशेष अधिकारी किरण गायकवाड, शाळेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. धनंजय वरणेकर, सचिव ज्ञानेश्वर काळभोर, प्राचार्या सरबजीत कौर महल, परीक्षित कुंभार यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थी जिवन हसत खेळत आणि तणावमुक्त जगा. मोठ्या स्पर्धांमध्ये सहभाग घ्या. आत्मविश्वास वाढवून सकारात्मक गोष्टींचा विचार करायला हवा. मित्र चांगले बनवून अभ्यासाची प्रक्रीया समजून घेत निरंतर असू द्या, कठोर मेहनत, प्रामाणिकपणा, निरंतर प्रयत्न या त्रिसुत्रीतूनच यश प्राप्ती होत असते. विद्यार्थी दशेत सोशल मिडीयाचा वापर टाळणे हितावह आहे. आपले शालेय जिवन आनंदाने व्यतीत केले पाहिजे, आणि त्यातून आयुष्य चांगल्या पध्दतीने घडविण्याचा पाया रचला पाहिजे. स्वत:वर विषय लादून न घेता आपल्या आवडत्या विषयात करियची संधी शोधायला हवी, असा सल्ला देखील आयुक्त शेखर सिंह यांनी विद्यार्थ्यांना दिला. तसेच, विद्यार्थी दशेपासून ते आजपर्यंतचा व्यक्तीगत अनुभव सुध्दा त्यांनी कथन केला. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सुरुवात होवून मान्यवरांचा सत्कार सोहळा पार पडला. तसेच, विविध स्पर्धेत प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. स्कूलच्या प्राचार्या सरबजीत कौर महल यांनी स्कूलमध्ये सूरू असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. विद्यार्थी व विद्यार्थीनींनी नृत्य सादरीकरण आणि गीत गायनाने सर्वांचे लक्ष वेधले. यादरम्यान, आयुक्त शेखर सिंह यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचे निराकरण केले. विद्यार्थी जिवनात घ्यावयाची काळजी, तणावमुक्त अभ्यास, परिक्षांना सामोरे जातांना करावयाचे नियोजन, चांद्रयान -३, स्मार्ट सिटी मिशन, शहर विकासाची आव्हाने आणि नियोजन, वाहतुक व्यवस्था व आव्हाने, शिक्षणाच्या संधी, करियर क्षेत्र निवडताना घ्यावयाची काळजी, महापालिका प्रशासनाद्वारे सुरु असलेले कार्य, स्वच्छता अभियान, शहराची सुरक्षा, स्पर्धा परिक्षा अभ्यास, आदी विषयांवर विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची आयुक्त सिंह यांनी उत्तरे दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रिया मलिक यांनी केले. कार्यक्रमाचे संयोजन स्मार्ट सारथी टीमच्या वतीने करण्यात आले.


### आवडत्या विषयात करियची संधी शोधा

**» विद्यार्थी जिवन हसत खेळत आणि तणावमुक्त जगा. मोठ्या स्पर्धांमध्ये सहभाग घ्या. आत्मविश्वास वाढवून सकारात्मक गोष्टींचा विचार करायला हवा. मित्र चांगले बनवून अभ्यासाची प्रक्रीया समजून घेत निरंतर असू द्या, कठोर मेहनत, प्रामाणिकपणा, निरंतर प्रयत्न या त्रिसुत्रीतूनच यश प्राप्ती होत असते. विद्यार्थी दशेत सोशल मिडीयाचा वापर टाळणे हितावह आहे. आपले शालेय जिवन आनंदाने व्यतीत केले पाहिजे, आणि त्यातून आयुष्य चांगल्या पध्दतीने घडविण्याचा पाया रचला पाहिजे. स्वत:वर विषय लादून न घेता आपल्या आवडत्या विषयात करियची संधी शोधायला हवी, असा सल्ला देखील आयुक्त शेखर सिंह यांनी विद्यार्थ्यांना दिला.**

# युवक काँग्रेसकडून भारत जोडो लीडरशिप!

## विद्यार्थ्यांचे नुकसान करुन पुण्यात तीन दिवस संघाची बैठक

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** भारतीय युवक काँग्रेसचे उद्दिष्ट युवकांच्या सक्षमीकरणाला चालना देणे आणि देशातील घटनात्मक आणि लोकशाही मूल्यांना चालना देणे हे आहे. लोकशाहीची मुळे मजबूत करण्यासाठी भारत जोडो लीडरशिप प्रोग्राम सुरू केला आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून देशाची लोकशाही आणि राज्यघटना वाचवण्यासाठी राजकारणात येऊ इच्छिणाऱ्या आणि तळागाळातून देश समजून घेण्यासाठी युवक काँग्रेसमध्ये सामील होऊ इच्छिणाऱ्या तरुणांपर्यंत पोहोचणे हा यामागचा उद्देश आहे असे मत पुणे युवक काँग्रेस मीडिया सेलचे चेअरमन अक्षय जैन यांनी पत्रकार



परिषदेत व्यक्त केले. यावेळी युवक काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव डॉ. वैष्णवी किराड, पुणे शहर अध्यक्ष राहुल शिरसाट, पिंपरी चिंचवड अध्यक्ष कौस्तुभ नवले. जिल्हा अध्यक्ष महेश टापरे उपस्थित होते. जैन म्हणाले की, भारत जोडो यात्रेच्या एका वर्षाच्या प्रवासाची उद्दिष्ट देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवण्यासाठी त्याच प्रवाहात आम्ही नेतृत्व कार्यक्रम आणला आहे. या कार्यक्रमात सहभागी होऊन देशातील तरुण आपण राजकीयदृष्ट्या सक्षम होऊ आणि आपल्या भविष्यासाठी अधिक चांगली धोरणे तयार करू शकू . जिथे इतर पक्षांचे नेते द्वेषाची बीजे पेरतात तिथे युवक काँग्रेस कार्यकर्ते म्हणून आम्ही शांततेचे रोप लावतोय. या देशातील तरुणांसमोर अनेक आव्हाने आहेत. देशाचे पंतप्रधान तरुण पिढीसाठी २ कोटी नोकऱ्यांची हमी देण्याचा दावा करतात.या कार्यक्रमातून आम्ही एक व्यासपीठ तयार केले आहे प्रत्येक तरुणांना एकाच छताखाली येऊन लोकशाही आणि संविधानाचा आनंद घेता यावा यासाठी तयार करण्यात आले आहे. आम्ही सुरक्षेसाठी आमचा लढा आणखी मजबूत करू. भारत जोडो नेतृत्व कार्यक्रम हा भारतीय युवक काँग्रेसचा नवीन उपक्रम आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत सक्रियपणे सहभागी होऊ इच्छिणाऱ्या तरुणांना सामावून घेण्यासाठी हा उपक्रम आहे. ज्या युवकांना २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत काम करायचं आहे. २०२४ च्या निकालांवर या अशा पद्धतीने युवकांचा सहभाग नक्कीच बदल घडवेल. तरुणांना आणि विद्यार्थ्यांना एका छताखाली एकत्र आणण्यासाठी हा कार्यक्रम असणार आहे.

### तरुणांसमोर अनेक आव्हाने

» भारत जोडो यात्रेच्या एका वर्षाच्या प्रवासाची उद्दिष्ट देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवण्यासाठी त्याच प्रवाहात आम्ही नेतृत्व कार्यक्रम आणला आहे. या कार्यक्रमात सहभागी होऊन देशातील तरुण आपण राजकीयदृष्ट्या सक्षम होऊ आणि आपल्या भविष्यासाठी अधिक चांगली धोरणे तयार करू शकू. जिथे इतर पक्षांचे नेते द्वेषाची बीजे पेरतात तिथे युवक काँग्रेस कार्यकर्ते म्हणून आम्ही शांततेचे रोप लावतोय. या देशातील तरुणांसमोर अनेक आव्हाने आहेत. देशाचे पंतप्रधान तरुण पिढीसाठी २ कोटी नोकऱ्यांची हमी देण्याचा दावा करतात.या कार्यक्रमातून आम्ही एक व्यासपीठ तयार केले आहे प्रत्येक तरुणांना एकाच छताखाली येऊन लोकशाही आणि संविधानाचा आनंद घेता यावा यासाठी तयार करण्यात आले आहे. आम्ही सुरक्षेसाठी आमचा लढा आणखी मजबूत करू.

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची पुण्यात समन्वय बैठक

## सामाजिक परिवर्तनासाठीच्या प्रयत्नांवर चर्चा

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अखिल भारतीय समन्वय बैठकीला गुरवारी पुण्यात सुरूवात झाली. सरसंघचालक डॉ. मोहन भागवत आणि सरकार्यवाह दत्तात्रेय होसबाळे यांच्या हस्ते भारतमातेच्या प्रतिमेला पुष्पार्चन करून बैठकीस प्रारंभ झाला. बैठकीस ३६ संघटनांचे प्रमुख २६७ पदाधिकारी सहभागी झाले असून त्यांत ३० महिला आहेत. या बैठकीला उपस्थित असलेल्यांमध्ये प्रामुख्याने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सर्व सह सरकार्यवाह डॉ. कृष्णगोपाल, डॉ. मनमोहन वैद्य, अरूण कुमार,मुकुंदा आणि रामदत्त चक्रधर, अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य भय्याजी जोशी, सुरेश सोनी, व्ही. भागैय्या, राष्ट्र



सेविका समितीच्या प्रमुख संचालिका शांताक्का, प्रमुख कार्यवाहिका अन्नदानम सीताक्का, 'महिला समन्वय' च्या वतीने चन्दाताई, 'स्त्री शक्ती'च्या अध्यक्षा शैलजा, राष्ट्रीय सेवा भारतीच्या महामंत्री रेणु पाठक, वनवासी कल्याण आश्रमाचे अध्यक्ष रामचन्द्र खराड़ी उपस्थित आहेत. तर विश्व हिंदु परिषदेचे कार्यकारी अध्यक्ष आलोक कुमार, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे अध्यक्ष राजशरण शाही, भारतीय जनता पार्टीचे अध्यक्ष जगत प्रकाश नड्डा, भारतीय किसान संघाचे संघटन मंत्री दिनेश कुलकर्णी, 'विद्या भारती'चे अध्यक्ष रामकृष्ण राव, पूर्व सैनिक सेवा परिषदेचे अध्यक्ष लेफ्टनंट जनरल विष्णुकान्त चतुर्वेदी (निवृत्त), भारतीय मजदूर संघाचे अध्यक्ष हिरण्मय पंड्या, 'संस्कृत भारती'चे संघटन मंत्री दिनेश कामत यांचा समावेश आहे. तीन दिवसांच्या या बैठकीत सध्याची राष्ट्रीय व सामाजिक परिस्थिती, शिक्षण, सेवा, आर्थिक व राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित मुद्द्यांवर चर्चा होईल. सामाजिक परिवर्तनाशी संबंधित पर्यावरण, कुटुंब प्रबोधन, सामाजिक समरसता, स्वदेशी आचरण तसेच नागरी कर्तव्याच्या विषयांना अधिक गती देण्यासंदर्भातही चर्चा होईल. संघटनेचा विस्तार आणि विशेष उपक्रमांच्या माहितीचेही आदानप्रदान करण्यात येईल.या बैठकीचा समारोप १६ सप्टेंबर रोजी होईल.

### ३६ संघटनांचे प्रमुख २६७ पदाधिकारी

» राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अखिल भारतीय समन्वय बैठकीला गुरवारी पुण्यात सुरुवात झाली. सरसंघचालक डॉ. मोहन भागवत आणि सरकार्यवाह दत्तात्रेय होसबाळे यांच्या हस्ते भारतमातेच्या प्रतिमेला पुष्पार्चन करून बैठकीस प्रारंभ झाला. बैठकीस ३६ संघटनांचे प्रमुख २६७ पदाधिकारी सहभागी झाले असून त्यांत ३० महिला आहेत. या बैठकीला उपस्थित असलेल्यांमध्ये प्रामुख्याने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सर्व सह सरकार्यवाह डॉ. कृष्णगोपाल, डॉ. मनमोहन वैद्य, अरूण कुमार,मुकुंदा आणि रामदत्त चक्रधर, अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य भय्याजी जोशी, सुरेश सोनी, व्ही. भागैय्या, राष्ट्र सेविका समितीच्या प्रमुख संचालिका शांताक्का, प्रमुख कार्यवाहिका अन्नदानम सीताक्का, 'महिला समन्वय' च्या वतीने चन्दाताई, 'स्त्री शक्ती'च्या अध्यक्षा शैलजा, राष्ट्रीय सेवा भारतीच्या महामंत्री रेणु पाठक, वनवासी कल्याण आश्रमाचे अध्यक्ष रामचन्द्र खराड़ी उपस्थित आहेत.

# वर्तुळाकार रस्त्यासाठी सक्तीने भूसंपादन?

## काही जागामालकांचा असहकार; जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (महाराष्ट्र स्टेट रोड डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन – एमएसआरडीसी) वर्तुळाकार रस्ता प्रकल्पासाठी भूसंपादन प्रक्रिया वेगाने सुरू आहे. मात्र, अद्यापही काही गावांतील जागामालकांनी प्रकल्पासाठी जागा देणार किंवा कसे याबाबत प्रशासनाला भूसंपादन नोटीस मिळूनही कळविलेले नाही. संबंधित जागाबाबत निर्णय घेण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली प्रांत, तहसीलदार, भूसंपादन अधिकाऱ्यांची गुरुवारी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक बोलाविण्यात आली आहे. या बैठकीत सक्तीने भूसंपादनाचा निर्णय घेतला जाण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.




पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी रस्ते महामंडळाकडून १७२ किलोमीटर आणि ११० मीटर रुंदीचा वर्तुळाकार रस्ता प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पाचे पूर्व आणि पश्चिम असे दोन भाग करण्यात आले आहेत. पूर्व मार्गातील मावळ तालुक्यातून ११, खेड १२, हवेली १५, पुरंदरमधील पाच आणि भोरमधील तीन गावांतून प्रस्तावित आहे, तर पश्चिम मार्गावरील भोर तालुक्यातील पाच, हवेली ११, मुळशी १५ आणि मावळ तालुक्यातून सहा गावे बाधित होणार आहे. संपूर्ण प्रकल्पासाठी २६ हजार ८०० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. पश्चिम मार्गावरील ३२ गावांचे, तर पूर्वेकडील चार गावांचे फेरमूल्यांकनानुसार दर निश्चित झाले आहेत. त्यानुसार २५८१ स्थानिक बाधित होत आहेत. सर्व बाधितांना भूसंपादनाच्या नोटीस बजाविण्यास सुरुवात करण्यात आली आहे. याबाबत बोलताना जिल्हाधिकारी डॉ. देशमुख म्हणाले, 'आतापर्यंत जिल्हा प्रशासनाने ४०५ एकर जमिनीचे संपादन केले आहे, मोबदल्यापोटी तब्बल ८३० कोटी रुपयांचे वाटप करण्यात आले आहे. मोबदल्याची रक्कम बाधितांच्या थेट बँक खात्यात जमा करण्यात येत आहे. राज्य शासनाच्या सुचनेनुसार पश्चिम आणि पूर्व भागातील बाधित गावांचे फेरमूल्यांकन करण्यात आले आहे. पश्चिम भागातील बाधित होणाऱ्या मावळ, मुळशी, भोर आणि हवेली तालुक्यातील ३२ गावांतील ६९७ हेक्टर क्षेत्रातील २४०४ स्थानिक बाधित होणार आहे, तर पूर्वे कडील भोर तालुक्यातील चार गावांतील १०५ हेक्टर क्षेत्रातील १७७ स्थानिक बाधित होत आहेत. भूसंपादन नोटीस देऊनही अद्याप अनेक जागामालकांनी जमीन देणार किंवा कसे, याबाबत प्रशासनाला कळविलेले नाही. त्यामुळे ही शिल्लक जमीन कशी ताब्यात घ्यायची याबाबत गुरुवारी बैठक बोलविण्यात आली आहे. त्यामध्ये या जमिनीच्या संपादनाबाबत निर्णय घेण्यात येईल.'

### जागामालकांनी सहकार्य करावे

» 'राज्य शासनाच्या सूचनेनुसार नवीन नियमावलीप्रमाणे दर निश्चित करण्यात आल्याने निश्चितच प्रकल्पग्रस्तांना फायदा होत आहे. सुधारित नियमाप्रमाणे थेट लाभ हस्तांतर करून भूसंपादन करण्यात येत आहे. त्याआधी बाधितांमधील समस्या, लाभाचे हस्तांतरण, हस्तांतरित रकमेचा विनियोग आणि सुरक्षिततेबाबत बाधितांसाठी शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे. प्रकल्पासाठी स्वत:हून जमीन देणाऱ्यांना अधिकचा मोबदला देण्यात येत असल्याने जागामालकांनी जमीन देऊन सहकार्य करावे', जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी म्हटले आहे.

# बाणेर, बालेवाडी, औंध भागात बंदला संमिश्र प्रतिसाद!

## मराठा क्रांती मोर्चा, सकल मराठा समाजाकडून लाक्षणिक उपोषण

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** जालना येथील आंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणासाठी केलेल्या मागण्या राज्य सरकारने तातडीने मान्य कराव्यात यासह समाजाच्या इतर प्रलंबित मागण्यांसाठी गुरुवारी (१४ सप्टेंबर) शहराच्या बाणेर, पाषाण, बालेवाडी, बोपोडी, औंध, सुतारवाडी, म्हाळुंगे, सोमेश्वरवाडी आणि सूस या भागातील व्यापाऱ्यांनी दुकाने बंद ठेवली होती. तसेच पालकांनी पाल्यांना शाळा, महाविद्यालयात न पाठवणेच पसंत केले. उर्वरित शहरातील सर्व व्यवहार सुरळीत होते.दरम्यान,




विविध मागण्यांसाठी मराठा क्रांती मोर्चा व सकल मराठा समाजातर्फे हुतात्मा बाबू गेनू चौकात एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण आंदोलन करण्यात आले. शहरातील बाणेर, बालेवाडी, बोपोडी, औंध या भागांत बंद पुकारण्यात आल्याचा संदेश बुधवारी समाजमाध्यमांतून प्रसारित झाला होता. याबाबत मराठा क्रांती मोर्चाकडून बंद नसल्याचे स्पष्ट करण्यात आले होते. या परिसरातील काही शाळा, महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना सुट्टी दिली होती, तर अनेक पालकांनी आपल्या पाल्यांना शाळा, महाविद्यालयांत न पाठवणेच पसंत केले.या परिसरातून हिंजवडीला जाणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रवासादरम्यान कोणताही त्रास होऊ नये, यासाठी अनेक कंपन्यांनी त्यांना 'वर्क फ्रॉम होम' करण्याची सुविधा दिली होती. या भागातील व्यापाऱ्यांनी दुकाने बंद ठेवली होती. कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलिसांनी मोठा बंदोबस्त ठेवला होता. दरम्यान, मराठा समाजाला आरक्षण द्यावे, जालना येथील आंदोलकांवर लाठीमार करणाऱ्या दोषी पोलिस अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी आदी मागण्यांसाठी मराठा क्रांती मोर्चा, सकल मराठा समाजाकडून गुरुवारी सकाळी दहा ते दुपारी दोन या वेळेत हुतात्मा बाबू गेनू चौकात एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण आंदोलन करण्यात आले. श्रावणी मेमाणे या मुलीच्या हस्ते मराठा क्रांती मोर्चाच्या समन्वयक श्रुतिका पाडळे आणि अन्य कार्यकर्त्यांना लिंबूपाणी देऊन उपोषण सोडण्यात आले. समन्वयक राजेंद्र कोंढरे, बाळासाहेब आमराळे, युवराज दिसले आदींच्या मार्गदर्शनाखाली १५० ते २०० कार्यकर्त्यांनी उपोषण केले.

### शाळांमध्ये उपस्थिती कमी

» पुणे बंदबाबत समाजमाध्यमांतून संदेश मोठ्या प्रमाणात प्रसारित झाल्याने विद्यार्थी-पालक, विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या स्कूल व्हॅनचालकांमध्ये संभ्रम निर्माण झाला. पुणे बंदच्या संदेशामुळे काही शाळांच्या स्कूलव्हॅन चालकांनी वाहतूक बंद ठेवण्याचा निर्णय घेतला, तर काही शाळांनी पालकांनी आपल्या जबाबदारीवर विद्यार्थ्यांना शाळेत सोडण्याबाबतचे संदेश पालकांना पाठवले. त्यामुळे पालकांना मुलांना शाळेत सोडावे लागले. तसेच काही शाळांमध्ये विद्यार्थ्यांची उपस्थिती कमी असल्याने शाळा लवकरच सोडण्यात आल्या. काही शाळा बंद ठेवण्यात आल्याचे चित्र होते.